


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे    अंक : ७६३. वा    सोमवार    दि. ०६ मे २०२४    पृष्ठ ८    किंमत ३रुपये

# भ्रष्टाचार दाबण्यासाठी एकावरच कारवाई,बाकी मात्र मोकाट का?

## जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार प्रकरणी ठोस कारवाईची तक्रारकर्त्यांची मागणी...

## सामान्य रुग्णालयातील दोषींवर कारवाई न झाल्यास तक्रारकर्ते जिल्हाभर आंदोलन छेडणार

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा रुग्णालयात औषधी व साहित्य उपकरणांच्या खरेदीतील भ्रष्टाचाराला दाबण्यासाठी भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांसी संगनमत करून एका अधिकाऱ्यावर निलंबनाची थातूरमातूर कारवाई केली. ही कारवाई या भ्रष्टाचाराच्या घाणीने बरबटलेल्या बाकी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे या भ्रष्टाचारात सामील सर्वांवर कारवाई करावी, तसेच त्यांनी भ्रष्टाचारातून जी काही अवैध चल अचल संपत्ती / अपसंपदा गोळा केली आहे, त्याचीही चौकशी करून जप्त करावी, अशी मागणी तक्रारकर्ते करू लागले आहे. येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात वर्षानुवर्षांपासून प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार सुरू होता. त्यातच कोरोना महामारी आली आणि या भ्रष्टाचाराने अक्षरशः जिल्हा रुग्णालयात थैमान घालणे सुरू केले. महामारीच्या संकटाला समोर करून गेल्या अनेक वर्षांत या ठिकाणी कार्यरत अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचाराचा अक्षरशः नंगा नाच केला. प्रचंड प्रमाणात औषधे व साहित्य उपकरणांची खरेदी कागदोपत्री दाखवण्यात आली. प्रत्यक्षात मात्र ही उपकरणे आणि औषधे जिल्हा रुग्णालयात कधीही पोहोचलीच नाहीत. ती मधल्या मध्येच गायब करण्यात आली. त्यातून तत्कालीन व प्रभारी जिल्हाशल्यचिकित्सकांपासून ते अगदी कनिष्ठ कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांनीच वाहत्या गंगेत स्वतःचे हात धुवून घेतले. हा भ्रष्टाचार राजरोसपणे सुरू होता आणि विशेष म्हणजे सर्व सम्मतीने सुरू होता. या ठिकाणी भ्रष्टाचाराचे एक अत्यंत सामुदायिक विद्रुप रूप समोर आलेले आहे.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने सर्वप्रथम या भ्रष्टाचाराचा

### पोस्टमार्टम ७७

**आरोग्य प्रशासनाकडे करोडो रुपयांची खरेदी केलेली वर्क ऑर्डर नुसार सर्व सामुग्री संबंधित अधिकाऱ्याच्या उपस्थितीत ऑन केमेरा तपासणी करण्याची मागणी तक्रारकर्ते करीत आहे. मग कळेल दुधका दूध पाणीका पाणी**

भंडाफोड केला. वृत्तमालिका सुरू केली, तेंव्हा अधिकाऱ्यांचे प्रचंड असे धाबे दणाणले. त्यानंतर बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी तर ९९ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार जिल्हा रुग्णालयात झाल्याचा आरोप करीत थेट विधानसभेत लक्षवेधी उपस्थित केली. अनेक समाजिक संघटना असतील आणि खुद्द सत्ताधारी भाजपचे नेते असतील, या सर्वांनी तर २०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करीत जिल्हा रुग्णालयात मोठे रणकंदन केले. या सर्वांना घाबरून मग जिल्हा रुग्णालय प्रशासनाने स्वतःची कातडी वाचवण्यासाठी तत्कालीन भांडारपाल प्रकाश बोथे यांच्यावर निलंबनाची कारवाई केली. परंतु बोथे हेच केवळ यात दोषी आहेत असे अजिबात नाही. बोथे देखील या भ्रष्टाचारात बरबटलेले आहेत. परंतु एकावर कारवाई करून हे प्रकरण तात्पुरते शांत करण्याचा अधिकाऱ्यांचा प्रयत्न होता. मात्र, या घोटाळ्यात केवळ प्रकाश बोथेच नाही तर जिल्हा रुग्णालय आणि अकोला येथील आरोग्य उपसंचालक




कार्यालयातील अनेक अधिकारी बरबटलेले आहेत. मोठा गहजब झाल्यानंतर शासनाच्या वतीने वेळोवेळी या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी समित्यांची नेमणूक केली. आतापर्यंत नाही म्हटले तरी कमीत कमी तीन ते चार चौकशी समित्या या ठिकाणी येऊन गेल्यात व त्यांनी चौकशी केली. चौकशी तर झाली मात्र समित्यांचे अहवाल आजही गुलदस्त्यातच आहेत. चौकशीत काय निष्पन्न झाले, याची माहिती आजवर समोर आलेली नाही. बरं जे कोणी दोषी आहेत, त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली याचीही माहिती कधीच समोर आली नाही. यावरून हे स्पष्ट आहे की, चौकशी समित्यांमध्ये जे अधिकारी होते, ते देखील हा भ्रष्टाचार दाबण्याचाच प्रयत्न करीत आहेत. या भ्रष्टाचारात अनेक अधिकारी लिप्त आहेत. त्यामुळेच एक वगळता कोणावरही कारवाई झाली नाही. खरे तर या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. कारण जिल्हा रुग्णालयात आजही काही बेशरम अधिकारी बेदरकारपणे भ्रष्टाचार करीत आहेत. भ्रष्टाचारामुळे अधिकाऱ्यांची कातडी एव्हढी कडक झाली आहे की, त्यांना कसलीही लाज-शरम आता भ्रष्टाचार करताना वाटत नाही. त्यामुळे आता तक्रार करणारे सामाजिक कार्यकर्ते देखील प्रचंड




आक्रमक झालेले आहेत. आता दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईसाठी कार्यकर्ते जोरदारपणे प्रयत्न करीत आहेत. अनेक अधिकारी या भ्रष्टाचारात सामिल असताना केवळ एकावरच कारवाई का? चौकशी समित्या येऊन चौकशी करतात परंतु पुढे कारवाई का होत नाही? चौकशी समित्याही भ्रष्ट अधिकाऱ्यांनी मॅनेज केल्या का? भ्रष्ट अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचारातून जी चल अचल अवैध संपत्ती गोळा केली आहे, ती कधी जप्त करणार? भ्रष्ट अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करून त्यांना गजाआड कधी करणार? असे प्रश्न हे तक्रारकर्ते उपस्थित करू लागले आहेत. या भ्रष्टाचाराविरोधात तक्रार करणारे तक्रारकर्ते येत्या काळात या विषयावरून प्रचंड आक्रमक होणार असून, या प्रकरणी बुलढाण्याचे जिल्हाधिकारी असो किंवा राज्याचे लोकायुक्त या सर्वांकडे जोरदारपणे पाठपुरावा केला जाणार आहे. यासंदर्भात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज तक्रारकर्त्यांच्या पाठीशी असून, जोपर्यंत जिल्हा रुग्णालयातील हे भ्रष्टाचारी किडे बाहेर फेकून देत नाही, तोपर्यंत सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन देखील शांत बसणार नाही.

अजून बरेच काही पुढील भागात...

# दोन घरे फोडून दागिन्यांसह दीड लाखांची ऐवज केली लंपास...

**जनसंचलन/ खामगाव**

दोन घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने घरातील रोख रक्कम, सोन्या चांदीच्या दागिन्यांसह १ लाख ६६ हजार रुपयाचा ऐवज लंपास केल्याची घटना तालुक्यातील जळका भडंग येथे उघडकीस आली आहे. याप्रकरणी तक्रारीवरुन पिं. राजा होते पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. रणजीत रविंद्र गायगोळ वय ३६ वर्ष रा. श्रीराम नगर, जळका भडंग यांचे आई वडील व घरासमोर राहणारे व मोठे भाऊ किरण रविंद्र गायगोळ हे तर रणजीत रविंद्र गायगोळ हे रात्री जेवण करुन दरवाजाला लावुन दोन्ही कुलूप गच्चीवर झोपण्यासाठी गेले . रात्री दरम्यान ते बाथरूमसाठी गच्चीवरून खाली आले तेव्हा त्यांना घराचे दोन्ही दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसले. त्यामुळे त्यांनी घरात जाऊन पाहिले असता घराचे लाकडी कपाटातील सोयाबीन विक्री करुन ठेवलेले नगदी ५० परिवारासह अंजनगांव सुर्जी येथे लग्नासाठी गेले होते. हजार रुपये फोन चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. तसेच नगदी घरासमोर असलेल्या भाऊ किरण रविंद्र गायगोळ यांच्या घरातील व घरामोरील लाइट सुरु असल्याचे दिसले त्यामुळे त्यांनी तेथे जावुन पाहिले असता त्यांचे घराचे दरवाजे कडीकोडे तोडलेले दिसले व भावाचे घरामध्ये सुध्दा चोरी झाल्याचे दिसले. त्यामुळे रणजीत गायगोळ यांनी भावाला करून बोलावुन घेतले व पाहणी केली असता त्यांनी कपाटामधील ८० हजार रुपये व पर्समध्ये पत्नीचे सोन्याचे दोन डोरले, एक सोन्याची अंगठी, एक सोन्याची नथ, नगदी असा एकुण १ लाख ६६ हजार रुपयाचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी



चोरून नेल्याचे दिसले. याबाबत रणजीत रविंद्र गायगोळ यांनी पिं. राजा पोस्टेला तक्रार दिली त्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध कलम ४५७, ३८० भादंविनुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोउपनि किशोर बर्वे हे करीत आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पुरवठा निरीक्षक डी शेख यांच्या चौकशीची मागणी!

जनसंचलन/ सिंदखेडराजा

सिंदखेडराजा तहसील कार्यालयामध्ये पुरवठा निरीक्षक दादुमिया शेख यांच्या कार्यकाळामधील ज्या लोकांना राशन कार्ड कुठल्याही प्रकारचा अर्ज न घेता वितरित केले त्या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी तसेच डी शेख यांची खातेनिहाय चौकशी करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते बबन सरकटे यांनी जिल्हा अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे ,त्यांनी पुढे दिलेल्या निवेदनात नमूद केली आहे की पुरवठा निरीक्षक दादुमिया उर्फ डि शेख यांनी ओळखीच्या व जवळच्या व्यक्तींना कुठल्याही प्रकारच्या अर्जा न घेता त्यांना तसेच राशन कार्ड वितरित केले तसेच त्यांच्याकडून पैसे सुद्धा घेतले, त्यांच्या कार्यकाळामध्ये वितरित झालेल्या राशन करण्याचे अर्ज किती उपलब्ध झाले व किती कार्ड वितरित केले याची चौकशी करावी अशी मागणी सुद्धा सरकटे यांनी केली आहे,तसेच मोठा अपहार झाल्यामुळे त्यांचे खाते न्याय चौकशी सुद्धा करावी अशी मागणी बबन सरकटे यांनी केली आहे




सदर मागणी पूर्ण झाल्यास जिल्हा पुरवठा अधिकारी बुलढाणा यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचेही बबन सरकटे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# जैस्वाल यांनी लग्नाचा वाढदिवस सेवाभावी दिव्या फाऊंडेशन येथे अन्नदान करून केला साजरा

जनसंचलन/बुलढाणा

माणसात ला देव म्हणजे अशोक काकडे तळागाळातील मतिमंद,मानसिक रुग्ण लोकांन,अन्न,वस्त्र,निवारा देण्याचे मोलाचे कार्य दिव्या फाऊंडेशन करते.मानसिक रित्या खच्चिकरण झालेले,भटकंती करत इकडे तिकडे फिरणारे असे आणि अनेक लोक आणणे आणि त्याची देखभाल करणे तितके सोपे नाही.पण अशोक काकडे अगदी हसत खेळत हे कार्य करतात.अश्या या सेवाभावी संस्थेत अन्नदान करून मिळा-लेला आनंद हा व्यक्त करता येत नाही. त्यामुळे प्रत्येकाने समाजातील गरजू व्यक्तीला यथाशक्ती मदत करावी, अशी शिकवण आपली संस्कृती देते. यातूनच बालाप्रसाद जैस्वाल त्यांच्या पत्नी यांना ही वाटले कीआपणही



समाजासाठी थोडा सेवाभाव ठेवावा आणि या विचारांनी झेप घेत..त्यांनी दिव्या फाऊंडेशन ला भेट दिली आणि अन्न दानाचे छोठेशे कार्य केले. आपल्या लग्नाचा २५ वां वाढदिवस सेवा देऊन त्यांनी साजरा केला.

# पत्रकार दिलीप वनवे साई कलारत्न समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

## ओम साई विकास प्रतिष्ठान व बीबीसी फ़िल्म प्रॉडक्शनच्या वतीने पुरस्कार सोहळा संपन्न...

जनसंचलन/बुलडाणा

सामाजिक, राजकीय आणि पत्रकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना गेल्या अनेक वर्षापासून ओम साई विकास प्रतिष्ठान व बीबीसी फिल्म प्रोडक्शन च्या वतीने साई कलारत्न समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावर्षी होणाऱ्या पुरस्कारा साठी मातृतीर्थ सिंदखेड राजा मतदार संघातील बायगांव बु येथील माजी उपसरपंच, माजी सरपंच पती तथा पत्रकार दिलीप वनवे यांना साईबाबाची पुण्यनगरी शिर्डी येथे ओम साई कलारत्न समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दि.३ में रोजी शिर्डी येथील सिद्ध संकल्प येथे ओम साई विकास प्रतिष्ठान व बीबीसी फ़िल्म प्रॉडक्शनच्या वतीने पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सुदाम कचरू संसारे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून किशोर कालाड, उत्तमराव पाटील, साई वासनिक, सतीष खंडविकर, काळुराम ढोबळे, सोपानराव हिरमळ, डॉ. रविन्द्र पाटिल, डॉ.अजय वारूळे, सीमा सपकाळ आदी मान्यवर उपस्थित होते.सामाजिक, राजकीय, चित्रपट सृष्टीतील आणि पत्रकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना गेल्या अनेक वर्षापासून ओम साई विकास



प्रतिष्ठान व बीबीसी फिल्म प्रोडक्शन च्या वतीने साई कलारत्न समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावर्षी साईबाबाच्या पावन भूमित चित्रपट सृष्टीतील मान्यवरांच्या हस्ते दिलीप वनवे यांना साई कलारत्न समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी सुनंदा सूर्यवंशी, राजा भालेराव, राजू शेठ, प्रतीक्षा सरकटे कु.शितल वाघ, संजय ढाकरके, राजेश काळे, सलीम सौदागर, बाळासाहेब बोराडे, गोरख भंडारी, मधुकर बनसोडे, नंदन खरे, पांडुरंग गोरे,वजीर भाई शेख, शामराव काळकुंड, अर्चना परदे-शी, आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.या सन्मानाने दिलीप वनवे यांचेवर अभिनंदना चा वर्षाव होतं आहे.

# अपघातग्रस्ताला दरीत फेकणाऱ्या आरोपीस अटक

जनसंचलन/ जळगाव जामोद

चारचाकी मालवाहू वाहनाने दुचाकीला धडक देत चालकाला जखमी केले. त्या जखमीला दवाखान्यात घेऊन जातो, अशी सबब सांगत त्याला वाहनात टाकून जंगलात नेले, त्याठिकाणी त्याला दरीत ढकलून दिले. वेळेत उपच-ार न मिळाल्याने त्या अपघातग्रस्त व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना २ मे रोजी उघडकीस आली. याबाबत जळगाव जामोद पोलिसात गुन्हा दाखल झाला. पोलिसांनी एका तासात आरोपीला अटक केली. जळगाव जामोद पोलिस स्टेशन हद्दीत ३० एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास निमखेडी ते सु-नगाव रोडवर मालवाहू वाहन क्रमांक एमएच-२७-बीएक्स-५३८२ च्या चालकाने दुचाकी क्रमांक एमएच-२८, एएच-९१८९ ला समोरून धडक दिली. यामध्ये दुचाकीस्वार मनसाराम छत्तरसिंग वासकले (रा. मेंढामारी) हा गंभीर जखमी झाला. तेथे मालवाहू चालकाने जखमीला दवाखान्यात घेऊन जातो, असे सांगून जखमीला गाडीमध्ये टाकले. तसेच बऱ्हाणपूर रोडवरील शांतीलाल सत्या याच्या शेतालगत गाडीतून ढकलून दिले. उपचार न मिळाल्याने जखमीचा मृत्यू झाला. याबाबत मृतकाचा भाऊ गमदास छत्तरसिंग वासकले याने १ मे रोजी रात्री जळगाव जामोद पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी प्रकरणात गुन्हा दाखल केला. तसेच मोबाइल लोकेशनवरून वाहनचालक आरोपी योगेश महाजन (रा. बोरसर, जि. बऱ्हाणपूर) यास चिंचखेडा (जि. जळगाव) येथून अटक केली आहे. पुढील तपास पोलिस करत आहेत.

# सोयाबीन दरवाढीची शेतकऱ्यांना प्रतीक्षा !

जनसंचलन/बुलढाणा

सोयाबीनच्या दरात वाढ होण-ार, काही रक्कम हातात शिल्लक रा-हणार, त्यावर बँक कर्ज, लग्न सो-हळे, यात्रा तर मुलांच्या शिक्षणाची सोय अन् खरिपाचे पीक नियोजन असे साधारणतः बजेट शेतकऱ्यांचे होते. मात्र, पिकाला अपेक्षित दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांवर कर्जाचा बोजा वाढत आहे. सद्यःस्थितीत सोयाबीन शेतकऱ्यांच्या घरात पडून आहे. त्यामुळे चिंता वाढली आहे. गतवर्षी शेतकऱ्यांनी मोठ्या अपे-क्षेने सोयाबीनचे पीक घेतले. जानेव-ारीत दरवाढ होईल, अशी अपेक्षा होती; परंतु दरांमध्ये अस्थिरता कायम राहिली. त्यानंतर लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली; मात्र सोयाबीनचा दर काही वाढला नाही. काही शेतकऱ्यांनी गरजेनुसार कमी दरात सोयाबीनची विक्री केली; मात्र अजूनही बहुतांश शेतकऱ्यांनी दरवाढीच्या अपेक्षेने सोयाबीन घरात साठवन ठेवले आहे.

# भरोसा येथे जबर चोरी चोर सीसीटीव्हीत कैद

जनसंचलन/ चिखली

तालुक्यातील मौजे भरोसा येथे ०४मे २०२४ रोजी भागवत नरहरी थुट वय वर्ष ३५ यांच्या घरी जबर चोरी झाली असून चोरांनी सोन्याची दीड तोळ्याची चैन व रोख रक्कम ६८ हजार ५०० तसेच भागवत थुटे यांच्या पत्नीच्या पर्स मधून अठरा हजार रुपये अशी रोख रक्कम लंपास केली आहे सदर चोर हे दोन वाजून १८ मिनिटांनी गावातील सीसीटीव्ही मध्ये दोन चोर गावात फिरताना दिसत आहे तसेच सदर चोरांनी एकनाथ कडुबा थुटे यांच्या घराचे कुलूप तोडले आहे व परिसरातील घराच्या कडया हि बाहेरून लावून घेतल्या होत्या भागवत थुटे यांच्या घरातील समान शेतामध्ये नेवून टाकले आहे भागवत थुटे यांच्या शेतात पाईपलाईनचे काम चालू असल्यामुळे भागवत थुटे यांनी बँकेमधून एक लाख रुपये कॅश आणले होते व काही पैसेही मजुरांना व दुकानदाराला दिले होते सदर चोरीचा प्रकार हा सकाळी उठल्यानंतर घरातील सामान्य असत व्यस्त दिसल्याचे पाहून भागवत थुटे यांच्या पत्नी यांनी भागवत थुटे यांना सांगितले गावचे पो-लीस पाटील तसेच गावातील प्रतिष्ठित व्यक्ती यांना माहिती मिळताच त्यांनी क्षणाचा ही विलंब न लावता अंढेरा पो-लीस स्टेशन गाठून सदर झालेला प्रकार अंढेरा पोलीस स्टेशन यांना सांगितलं आहे

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# उधारीच्या पैशांवरून वाद दोन गटांत तुंबळ हाणामारी

## परस्परविरोधी तक्रारीवरून १४ जणांवर गुन्हा दाखल

**जनसंचलन/ शेगाव**

तालुक्यातील आडसूळ येथे नातेवाइकांमध्ये तुंबळ हाणामारी झाली. ही घटना ३० एप्रिल रोजी घडली. याप्रकरणी परस्परविरोधी तक्रारींवरून दोन्हींकडील १४ जणांवर शेगाव ग्रामीण पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. रामदास जानुजी डोंगरे (६५) यांनी तक्रार दिली. त्यामध्ये त्यांचा मुलगा विलास डोंगरे याने त्याचा साळा चंद्रभान गुलाबराव भोजने याला दवाखान्यासाठी २ लाख रुपये दिले होते. ते मागण्यासाठी साळ्याला ३० एप्रिल रोजी रात्री फोन केला. परंतु, साळ्याने मुलाला अश्लील शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच घरी येत दोन मुलांना अश्लील भाषेत शिवीगाळ, लोटपाट करून जिवे मारण्याची धमकी दिली. आरोपी चंद्रभान भोजने याने त्याच्या हातातील लोखंडी रॉड डोक्यात मारून जखमी केले. तसेच कृष्णा कैलास हिंगणे, मंगेश गलाबराव भोजने, गलाबराव कष्णाजी नात्यात कटूता आल्यानंतर उधारीच्या पैशातून ही घटना घडली असल्याची चर्चा नातेवाईकांमध्ये होत आहे. गत काही दिवसांपासून दोन्ही परिवारांमध्ये तणावाचे वातावरण असल्याचेही पोलीस सुत्रांचे म्हणणे आहे.भोजने, भाऊराव कृष्णाजी भोजने, सूर्यभान गुलाबराव भोजने, रोहण भाऊराव भोजने, गोपाल हिंगणे, अमोल मुंडाले, सुरेश मुंडाले, रा. सर्व तिंत्रव यांनी त्यांच्या हातातील काठ्यांनी मारहाण केल्याचा आरोप केला. या मारहाणीत हात मोडल्याचेही नमूद केले. यावेळी घराशेजारी राहणाऱ्यांनी भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही शिवीगाळ करत डोके फोडल्याचे नमूद केले. या तक्रारीवरून आरोपीविरोधात कलम १४७, १४८, १४९, ४५२, ३२४, ३२३, २९४,५०६ नुसार गुन्हा दाखल केला. तसेच



मंगेश गलाबराव भोजने (३८) रा. तिंत्रव यांनी तक्रार दिली. त्यामध्ये विलास रामदास डोंगरे याने भावाच्या मोबाइलवर फोन करून त्यांची मुले आडसूळ येथे न नेल्यास त्यांना विष पाजून मारहाण करण्याची धमकी दिली. त्यामुळे मुलांना घेण्यासाठी भाड्याची गाडी नेली असता, रामदास डोंगरे, विलास डोंगरे, सिध्दार्थ डोंगरे, कलाबाई डोंगरे यांनी मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत केला. तक्रार व वैद्यकीय अहवालावरून शेगाव ग्रामीण पोलिसांनी भादंवि कलम ३२४, ३२३, ३३६, ५०४, ५०६, ४२७ ३४ नुसार गुन्हा दाखल केला. पुढील तपास ठाणेदार दिलीप वडगावकर यांच्या मार्गदर्शनात पोलिस करीत आहेत.

# पाच लाखांसाठी विवाहितेला जिवे मारण्याचा प्रयत्न



**जनसंचलन/ संग्रामपूर**

महिलांवर होणाऱ्या अत्याचार दिवसेंदिवस वाढत आहे.या घटनांवर कुठे तरी आळा बसयाल हवा आहे. माहेरातून पाच लाख रुपयेआणावे, या मागणीसाठी विवाहितेचा - छळ करणे, तसेच मारहाण करून गळा दाबून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना संग्रामपूर तालुक्यातील ग्राम पलसोडा येथे उघडकीस आली. विवाहितेच्या फिर्यादीवरून पतीसह - सासरच्या चौघांविरुद्ध सोनाळा पोलिस ठाण्यात विविध गुन्ह्यांची नोंद करण्यात आली. याबाबत वैशाली आनंता बाबुळकार (३०) या विवाहितेने २ मे रोजी सोनाळा - पोलिसात तक्रार दिली. त्यामध्ये २९ एप्रिल रोजी पतीसह सासरच्या मंडळींनी माहेरवरून ५ लाख रुपये आणण्यासाठी छळ करीत - लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच, गला दाबन जिते मारण्याचा प्रयत्न केल्याचे नमूद आहे. याप्रकरणी सोनाळा पोलिस ठाण्यात आरोपी अनंता शंकर बाबुळकार, बेबाबाड शंकर बाबुळकार, योगेश शंक- बाबुळकार, लक्ष्मी महादेव कळमका- सर्व राहणार पलसोडा यांच्यावर कलम ३०७, ४९८ (अ), ३२३, ५०४ भादविनुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

# दारूच्या नशेत धक्काबुक्की करून मारहाण...

**जनसंचलन/ खामगाव**

मित्रांसोबत उभे राहून गप्पा गोष्टी करीत असताना एका युवकाने दारूच्या नशेत दुसऱ्या युवकास धक्काबुक्की करून मारहाण केली. यावेळी भांडण आवरण्यासाठी गेलेल्या दुसऱ्यालादेखील मारहाण करून जखमी केले. ही घटना शुक्रवारी दुपारी खामगाव नांदुरा रस्त्यावरील एका हॉटेलसमोर घडली. तक्रारीनुसार ओम विजय देशमुख (२१) रा. वाडी हा नांदुरा रोडवरील एका हॉटेलसमोर मित्रांसोबत उभा होता. त्याच्या मित्राशी चर्चा करीत असताना प्रेम दामोदर नामक युवक तेथे आला. त्याने दारूच्या नशेत धक्काबुक्की करून ओम देशमुख याला मारहाण केली. यावेळी ओमचा मित्र संदीप जोशी भांडण आवरण्यास गेला असता, त्यालाही दगड मारून जखमी केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला. या तक्रारीवरून शहर पोलिसांनी आरोपी प्रेम दामोदर याच्या विरोधात भादंवि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोरेकॉं रमाले करीत आहेत

# विवाहितेने केला आत्महत्येचा प्रयत्न

**जनसंचलन/ खामगाव**

एका ३३ वर्षीय विवाहितेने विषारी औषध प्राशन केल्याने विवाहितेची प्रकृती अत्यवस्थ झाली. ही घटना शुक्रवारी सारोळा येथे घडली. आरती राठोड असे या महिलेचे नाव आहे. तिच्यावर खामगाव रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे. नेमक्या कोणत्या




कारनाने तीने आत्महत्येचा प्रयत्न केला हे स्पष्ट होऊ शकले नाही.

# लग्न जर उशिरा लागत आहे तर मग पत्रिकेवर वेळच कशाला हवी?

## लग्न मुहूर्तावर लागेना नागरिकांतून उमटतोय नाराजीचा सूर

**जनसंचलन/बुलडाणा**

अलिकडे सर्वत्र लग्नसराई सुरू आहे. कडक उन्हात लग्नाचे बार उडत असून, भर उन्हातान्हात घामाघूम झालेल्या पाहुणे मंडळींना ताटकळत ठेवून, उशिरा लग्न लावणे ही फॅशनच झाली आहे. नवरीच्या घरी वरात उशिरा पोहोचते. त्यानंतर डीजेच्या तालावर अनेकजण तासन्तास नाचत राहतात. त्यामुळे उशिरा लागत असलेल्या लग्नाबाबत सर्वच स्तरात नाराजी दिसून येत आहे. जर वेळेवर लग्न लागत नसतील तर मुहूर्त पाहायचा तरी कशाला असा प्रश्न अनेकजण उपस्थित करीत आहेत. काही सामाजिक संघटनांकडून अशा लग्नांवर बहिष्कार टाकण्यासाठी दबाव वाढत आहे. याबाबत सविस्तर असे की, सकाळी १०:३० वाजेचे लग्न दुपारी ४ वाजेपर्यंतही लागत नाही त्याचवेळी सायंकाळी साडेसहाचे लग्न नऊ ते



दहा वाजता लागते. सात वाजताच्या लग्नालाही वराती ताटकळत राहतात. त्यामुळे लग्न मुहूर्त काढायचा तरी कशासाठी असा प्रश्न काही संतप्त वऱ्हाडी मंडळीकडून उपस्थित केला जात आहे. उन्हाची तीव्रता जास्त असतानाही दुपारचे लग्न वेळेवर लावण्यासाठी वधू अथवा वर पक्षांकडून कोणतीही काळजी घेतली जात नाही. काही लग्नस्थळी लग्न लागण्याच्या मुहूर्तावर चक्क नवरदेवाची वरात पोहोचते. त्यानंतर नवरदेवाचे मित्र मंडळी आणि नातेवाईक नाचण्यात मग्न होतात. अशावेळी वऱ्हाडी मंडळीची चांगलीच कोंडी होते. सद्यस्थितीत सकाळी नऊ वाजेपासूनच उन्हाची दाहकता जाणवू लागते. सूर्य आग ओकू लागतो. पारा ४० ते ४३ अंशांच्या दरम्यान असतो. सकाळचे लग्न दुपारी व संध्याकाळचे रात्री उशिराने लागतात. त्यामुळे अनेकांना वऱ्हाडींच्या भावनांशी काही देणे घेणे नसल्याचेच दिसून येते.

# अब की बार ४०० पार भाजपवर घोषणा बाजूला ठेवण्याची वेळ कारण ठरताहेत मित्रपक्ष...



वृत्तसंस्था/मुंबई

देशात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. तिसऱ्या टप्प्यातला प्रचार काल थांबला. राज्यात उद्या ११ जागांवर मतदान होईल. यातील बहुतांश जागा पश्चिम महाराष्ट्रातील आहे. साखर पट्ट्यात कोणाच्या तोंडात साखर पडणार याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे. या पट्ट्यात राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद आहे. कोल्हापूर, हातकणंगलेत शिंदेसेनेचे उमेदवार आहेत. राज्यात भाजप पहिल्यांदाच २८ जागांवर लढत आहे. पण मित्रपक्षांमुळे भाजपची डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे भाजपवर अब की बार ४०० पारची घोषणा बाजूला ठेवण्याची वेळ आली आहे.देशभरातील मित्रपक्ष भाजपची डोकेदुखी वाढवत आहे. भाजपप्रणित एनडीएमध्ये ४० पक्ष आहेत. ते १०० जागांवर लढत आहेत. मात्र त्यांची कामगिरी समाधानकारक नसल्याचं भाजप नेतृत्त्वाला वाटतं. राज्यात लोकसभेच्या एकूण ४८ जागा आहेत. पैकी २० जागा मित्रपक्ष लढवत आहेत. शिंदेसेना १५, अजित पवारांची राष्ट्रवादी ४, तर राष्ट्रीय समाज पक्ष १ जागेवर लढत आहे.गेल्या निवडणुकीत शिवसेना, भाजप युतीनं ४१ जागा जिंकल्या होत्या. याच कामगिरीची पुनरावृत्ती करण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. त्यासाठी मिशन ४५ आखण्यात आलं आहे. पण बहुतांश सर्व्हे पाहता महायुतीला ४० पेक्षा जास्त जागा जिंकताना दिसत नाही. महायुतीला २८ ते ३० जागा मिळताना दिसत आहेत. भाजपची कामगिरी चांगली असेल, असं सर्व्हे सांगतात. पण मित्रपक्षांना फारसं यश मिळणार नाही, असे अंदाज आहेत. त्यामुळे भाजपची धाकधूक वाढली आहे.बिहारमध्ये लोकसभेच्या एकूण ४० जागा आहेत. यापैकी २३ जागा मित्रपक्षांना सोडण्यात आल्या आहेत. पण ते एकत्रितपणे प्रचार करु शकत नाही. लोकजनशक्ती (रामविलास) पक्षाचे अध्यक्ष चिराग पासवान यांनी २०२० च्या विधानसभा निवडणुकीत जनता दल युनायटेडच्या विरोधात भूमिका घेतली होती. त्यांच्यामुळे जनता दलाला बऱ्याच जागांवर फटका बसला. २०१५ मध्ये ७१ जागा जिंकणारा जनता दल ४३ जागांवर आला. त्याबद्दल मुख्यमंत्री नितीश कुमारांनी पासवान यांना माफ केलेलं नाही. चिराग पासवान यांचा पक्ष ५ जागा लढवत आहे. आरएलएम आणि हम यांच्यापुढेही आव्हान आहे. जदयू लढत असलेल्या १६ जागांपैकी अनेक जागा अडचणीत आहेत. कर्नाटकात सेक्स स्कॅण्डल उघडकीस आल्यानं देवगौडा यांचा जनता दल सेक्युलर पक्ष भाजपसाठी अडचणीचा ठरत आहे. कर्नाटकात भाजपनं २०१९ मध्ये २५ जागा जिंकल्या होत्या. पण सेक्स स्कॅण्डलमुळे भाजप आणि मित्रपक्षांना फटका बसू शकतो. त्यामुळे मागील कामगिरीची पुनरावृत्ती अवघड आहे. उत्तर प्रदेशात भाजपनं मित्रपक्षांना ६ जागा सोडल्या आहेत. २०१९ मध्ये भाजपनं उत्तर प्रदेशात ६४ जागा जिंकल्या होत्या.आंध्र प्रदेशात भाजपला चांगल्या कामगिरीची आशा आहे. युतीतील सहकारी पक्ष एकत्र काम करत असल्यानं लोकसभेच्या २५ जागांपैकी बहुतांश जागा जिंकण्याचा विश्वास भाजपला आहे. तमिळनाडू, केरळमध्ये यंदा खातं उघडलं जाईल असा आशावाद भाजपला आहे. आठ छोट्या पक्षांसह भाजप इथे लढत आहे

## भगवान परशुराम जयंती निमित्त सभा...

जनसंचलन/ खामगाव

दरवर्षीप्रमाणे यंदाही १० मे रोजी भगवान श्री परशुराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी भगवान परशुराम जन्मोत्सव समितीतर्फे पूर्वतयारी बैठक मंगळवारी मुक्तेश्वर आश्रम येथे पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी समाजाचे ज्येष्ठ मोहनलाल शर्मा व माधवराव जोशी होते. सभेमध्ये जन्मोत्सवानिमित्त राबविण्यात येणाऱ्या विविध धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा विषयी कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आली. श्यामसुंदर बोहरा, शेखर पुरोहित, संजय शर्मा, ओम शर्मा, सत्यनारायण थानवी, शंभू शर्मा, दामोधर पांडे, किसनलाल शर्मा, जितेंद्र पुरोहित यांच्या हस्ते भगवान परशुरामांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच विजयकुमार मूलचंद शर्मा यांना सामूहिक श्रद्धांजली देण्यात आली. सभेत राजस्थानी ब्राह्मण भवन, महाराष्ट्रीयन ब्राह्मण सभा, परशुराम सेवा समिती, बहुभाषिक ब्राह्मण महासंघ, विप्र फाउंडेशन, भ. श्री. परशुराम जन्मोत्सव समितीचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी १० मे रोजी सकाळी ९ वाजता भगवान परशुराम व्यायामशाळेत आरती करून दुचाकी रॅली काढण्याचे ठरवण्यात आले. तसेच फरशी येथील गोशाळेत मातृशक्तीतर्फे गोमातेस



गोग्रास वितरण करण्यात येणार आहे. नंतर सायंकाळी ५ वाजता राजस्थानी ब्राह्मण भवन बारादरी येथून पारंपरिक वाद्य, दिंडी, अश्व, उंट, विविध झाकी व आकर्षक रथांसह शोभायात्रा काढण्यात येईल. शोभायात्रा व सर्व कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जन्मोत्सव समितीतर्फे करण्यात आले.

## क्षुल्लक कारणावरून केली हाणामारी

जनसंचलन/मेरा बु



येथील एकाच समाजातील लोकांनी शुल्लक कारणावरून एकमेकांना लोखंडी रॉड व बॅटने हाणामारी केली त्यामध्ये दोन जण जखमी झाले. ही घटना मेरा बु फाट्यावर २ मे रोजी घडली. मेरा बु फाट्यावर वास्तव्यास असलेल्या प्रमिला प्रताप नाडे वय ४० वर्ष यांनी अंढेरा पोस्टेला दिलेल्या तक्रारीमध्ये नमूद केले की, घराचा दरवाजा का तोडला असे विचारले असता आरोपी दिलीप आव्हाड. राजू आव्हाड यांनी महिलेच्या डोक्यावर रॉड मारला व गौरव आव्हाड यांनी डाव्या हाताच्या दंडाजवळ बॅट मारून जखमी केले. हे पाहून महिलेचा मुलगा प्रवीण नाडे हा तिथे आला असता त्याला सुध्दा मारहाण केली. अशा महिलेच्या तक्रारी वरुण आरोपी दिलीप जयवंत आव्हाड, राजू दिलीप आव्हाड, गौरव राजू आव्हाड सर्व रा मेरा बु, यांच्या विरुध्द कलम ३२४,४२७,३४,ो तक्रारींवरुन ५ जणांवर गुन्हा भादवी प्रणाने गुन्हा दाखल केला तर दिलीप जयवंत आव्हाड वय ७० वर्ष यांनी तक्रारी मध्ये म्हंटले आहे की, आरोपी प्रवीण नाडे हा घरासमोर विनाकारण शिवीगाळ करत होता हे सांगण्यासाठी दिलीप जयवंत आव्हाड हे गावातील पंढरी मापारी यांच्याकडे सांगायला गेले असता प्रवीण नाडे यांनी दगड हातात घेवून पाठीवर मारला व त्याची आई प्रमिला प्रकाश नाडे हिने हातातील काठी डोक्यात व तोंडावर मारली. तसेच घरासमोर लावलेल्या दोन मोटर सायकलवर दगड टाकून नुकसान केले. अशा तक्रारीवरुन अंढेरा ठाणेदार विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार यांनी आरोपी प्रवीण प्रताप नाडे, प्रमिला प्रकाश नाडे रा. मेरा बुयांच्या विरुध्द कलम ३२४, ४२७, ५०४, ३४, भादवी नुसार गुन्हा दाखल केला.

## ढाब्यावर छापा दारूसह ६३० लिटर डिझेल जप्त

जनसंचलन/ खामगाव

उपविभागीय पोलीस अधिकारी विनोद ठाकरे यांच्या पथकाने नांदुरा रोडवरील सुनील ढाब्यावर छापा मारून या ठिकाणावरून मोठ्या प्रमाणावर देशी विदेशी दारूसह ६३० लिटर डिझेल देखील जप्त केले आहे. सदर ढाब्यावर मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या देशी व विदेशी दारूची विक्री सुरू असूनया ठिकाणी डिझेल देखील साठवून ठेवण्यात आलेले आहे अशी गुप्त माहिती डीवायएसपी विनोद ठाकरे यांना मिळाली होती. या माहितीवरून पोलीस पथकाने शुक्रवारी रात्री नांदुरा रोडवरील सुनील धाब्यावर छापा टाकला असता पोलिसांना या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर देशी-विदेशी दारू तसेच टाक्या व प्लास्टिक कॅनमध्ये डिझेल साठवून ठेवल्याचे दिसून आले. यावेळी पोलिसांनी येथून १३ हजार ९८० रू. ची देशी विदेशी दारु, ५७ हजार ३३० रु. ६३० लिटर डिझेल, घरगुती वापराचे ३ सिलेंडर, असा एकूण ८२ हजार ४८० रु. चा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी जलंब पोस्टेला ढाबामालक श्रीकृष्ण प्रल्हाद लाहुडकर वय ४९ वर्ष रा. चिखली आमसरी यांच्याविरूध्द कलम ३७ जीवनावश्यक वस्तू कायदा सहकलम ६५ ई मदाका नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोऊनि मनोज बासाडे, सुधाकर थोरात, सचिन सदाफुले, शुद्धोधन गागुरु यांनी केली आहे.

## आकडा टाकून १३ हजारांची वीज चोरी

जनसंचलन/ खामगाव

वीजचोरी शोधमोहीम अंतर्गत महावितरणच्या पथकाने वसाडी येथील अनिल बोदडे यांनी ७१३ युनिटची वीज चोरी केल्याचे स्पष्ट झाले. तपासणीअंती वर्षभरात संबंधिताने १३ हजार ५७३ रुपयांची वीज चोरी केल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान शुक्रवारी प्रकरणी



पिंपळगाव राजातील सहाय्यक अभियंता पंकज मिश्रांनी नांदुरा पोलिसात तक्रार दिली.